012277 A-18 ३

प्रिय बापू,

लहानपणी जेव्हा मी आईच्या हातातील नोट पाहिली, तेव्हा मी आईला विचारलं, की "हा कोणाचा फोटो आहे?" तेव्हा मला आईने सांगितलं की, "हा फोटो एका महान व्यक्तीचा आहे. त्यांचं नाव आहे, "महात्मा गांधी" लोक त्यांना आदराने बापू म्हणतात."

जेव्हा मी पहिली-दुसरीमध्ये शिकत होते, तेव्हा माझे शिक्षक सांगायचे, "शिक्षण घ्यायचं, तर स्वामी विवेकानंदांसारख्या एकाग्र चित्ताने अभ्यास करायला हवा. शिक्षणासोबतच इतर शालेय स्पर्धांमध्येही सहभाग घ्यायला हवा, आणि त्याचबरोबर गांधीजींसारखा स्वदेशाभिमान. देशासाठी काहीतरी करण्याची इच्छा मनात असली पाहिजे."

जेव्हा मला त्यांनी सांगितलं की, "महात्मा गांधीजि म्हणजेच भारताचे लाडके बापू, त्यांनी फक्त स्वदेशीचाच स्विकार केला. जे देश स्वतंत्र व्हावा म्हणून लढले." तेव्हा मला तुमच्याविषयी जाणून घेण्याची उत्सुकता निर्माण झाली. पुढे मी पाचवीत आल्यावर विविध पुस्तकातूनही तुमची खूप माहिती वाचायला मिळाली. तसेच, खूप शिक्षकांकडून खूप काही ऐकायला ही मिळाले आणि तेव्हाच मी तुम्हाला माझा आदर्श मानलं.

मला तुमच्या अहिंसावादी धोरणाचा खूप हेवा वाटतो. 'वाईट बोलू नका, वाईट ऐकू नका, वाईट पाहू नका' या तुमच्या ब्रीदवाक्याचा, तुमच्या अहिंसावादी धोरणाचा, एका गालावर थप्पड मारली तर दुसरा गाल पुढे करण्याच्या प्रवृत्तीचा जर आजच्या लोकांनी अवलंब केला तर, रोजच्या वर्तमानपत्रातील खून, मारामारी यांसारख्या बातम्यांची संख्या खूपच कमी होईल. एकूण काय? तर समाजातील हिंसा प्रवृत्ती कमी होईल.

मला आठवतय की मी सातवीच्या वर्गात शिकत होते, तेव्हा माझे हस्ताक्षर खूपच खराब होते. तेव्हा मला माझ्या शिक्षकांनी सांगितलं की, "गांधीजींचे हस्ताक्षरही हायस्कूलमध्ये असताना खूप खराब होते. त्यांनाही वाटत होते की, शिक्षणामध्ये हस्ताक्षर चांगले लिहिण्याची जरूरी नसते. त्यांचा हा गैरसमज विलायतेला जाईपर्यंत राहिला. दक्षिण आफ्रिकेमध्ये तेथील वकिलांची व तेथील मुलांची मोत्यांसारखी अक्षरे पाहिली, तेव्हा त्यांनी हस्ताक्षर सुधारण्याचा निर्णय घेतला, तेव्हा त्यांच्या लक्षात आले, की खराब हस्ताक्षर ही अर्धवट शिक्षणाची निशाणी समजली पाहिजे." या प्रसंगातून प्रेरणा घेऊन मी माझे हस्ताक्षर सुधारण्याचा निर्णय घेतला व त्यासाठी प्रयत्न करून मी माझे हस्ताक्षर सुधारले.

लहानपणापासूनच तुमच्याविषयी खूप काही ऐकलं होतं, त्यामुळे तुमच्याविषयी जाणून घेण्याची इच्छा होती, म्हणूनच तुम्ही लिहिलेलं, सत्याचे युग हे पुस्तक वाचलं, त्यातून मला एक श्लोक मिळाला त्याचा भावार्थच किती सुंदर आहे," जो पाणी देईल त्याला जेवण घालावे, एका पैशाची झीज सोशील त्याचे मोहरांनी ऋण फेडावे, एका उपकाराबद्दल दहा उपकार करावे; परंतु या जगात सर्वश्रेष्ठ तोच, जो काया-वाचा-मनें करून अपकाराच्या बाबतीतही उपकारच करतो." यापासून खूपच प्रेरणा मिळाली. 'अपकाराचा मोबदला अपकार नसून उपकारच होय', हे तुमचे जीवनसूत्रच सारी प्रेरणा देऊन जाते. अपकार करणाऱ्यांचे कल्याण करणे ही संकल्पनाच खूप खूप प्रेरित करते.

सुरुवातीपासूनच माझा स्वभाव लाजरा, मितभाषी असल्यामुळे मला घरचे लोक, शेजारी, शिक्षक म्हणत, की तू काही बोलत नाहीस, खूपच लाजरी आहेस. त्यातच तुमच्या लेखणीचा माझ्यावर खूप प्रभाव पडला. तुम्ही सत्याचे प्रयोगमध्ये लिहिलं आहे की, "सत्याच्या पुजाऱ्याने मौन सेवन करणे इष्ट आहे. ज्याला थोडेच बोलायचे आहे, तो विचार केल्याशिवाय बोलणार नाही. स्वतःचा प्रत्येक शब्द तोलून बोलेल." यातूनच प्रेरणा घेऊनच मी माझ्या लाजरेपणाला कमकुवतता न मानता मी माझी शक्ती मानू लागले व आत्मविश्वासी बनले. आणि याचा फायदा मला असा झाला की, माझ्या नेमक्या व अचूक वक्तव्याने शिक्षक तसेच समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती, ज्यांच्याशी माझा संपर्क येतो ते प्रभावित होतात. तसेच तुम्ही पुस्तकात सांगितलेले मांसाहाराचे तोटे वाचल्यापासून मी स्वतः मांसाहार करीत नाही, आणि इतरांनाही न करण्याचा सल्ला देते. खरंच बापू तुम्ही मला प्रेरित करता.

तुम्हाला पत्र लिहिण्याचा योग बऱ्याच दिवसांनी आला. तुमचा आशिर्वाद सदैव पाठीशी राहो, तुमच्याकडून अशीच प्रेरणा मिळत राहो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

आपली कृपाभिलाषी,
अमृता बाजीराव पाटील